

रत्नागिरी : 'कर्करोग निदान आपल्या दारी' या शिबिराचे उद्घाटन करताना डॉ. सुनिता चव्हाण, सोबत रितू छाब्रिया आ

# 'कर्करोग निदान आपल्या दारी'चे उद्घाटन

## 'फिनोलेक्स आणि मुकुल माधव'चा अभिनव उपक्रम; २० पर्यंत शिबीर

**रत्नागिरी : प्रतिनिधी**

फिनोलेक्स इंडस्ट्रीज लि. आणि मुकुल माधव फाऊंडेशन तसेच प्रशांती कॅन्सर केअर मिशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'कर्करोग निदान आपल्या दारी' या अभिनव उपक्रमाला सुरुवात झाली आहे. यानिमित्त शिबीर घेण्यात येत आहे. हे शिबीर २० डिसेंबरपर्यंत चालणार आहे.

'कर्करोग निदान आपल्या दारी' हा अभिनव उपक्रम प्रथमच रत्नागिरी व आजुबाजूच्या गावातील नोंदणी केलेल्या महिलांसाठी कर्करोग तपासणी शिबिराच्या माध्यमातून या अभिनव उपक्रमाला सुरुवात झाली. हे तपासणी शिबीर २० डिसेंबरपर्यंत रत्नागिरी व आजुबाजूच्या गावातील नोंदणी केलेल्या महिलांसाठी असून, या शिबिराचे औपचारिक उद्घाटन चिरायु हॉस्पिटलच्या स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. सुनिता चव्हाण यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. रमेश चव्हाण, मुकुल माधव फाऊंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाब्रिया, प्रशांती केअर मिशनच्या संचालिका लालेह गुशेरी, रक्षता अन्सारी, डॉ. ज्योती चव्हाण, संचालक डॉ. एस. एच. मठ, ए. बी. अत्रे, तातुगडे, डॉ. आशुतोष मुळ्ये, टी. के. काकडे, सागर चिवटे, गौरी शिरसागर, अभिषेक साळवी आदी उपस्थित होते.

या तपासणी शिबिरात प्रशांती कॅन्सर केअर मिशनच्या संचालि लालेह यांच्यासह तज्ज्ञ डॉक समुपदेशक व इतर सहक अद्ययावत तपासणी व्हॅन व इतर उपकरणांसहीत प्रत्येक गावात घे जाणार आहेत.

हे शिबीर सकाळी १० ते सायंक ५ या वेळेत मोफत भरवण्यात ये आहे. याशिवाय फिनोलेक्स इंडस लि. व मुकुल माधव फाऊंडेशन य संयुक्त प्रयत्नाने चिरायु हॉस्पिटल स्त्रियांच्या स्तनाच्या कर्करोगाचे नि केंद्र सुरु करण्याचे प्रयत्न सुरु अ यासाठी लागणारी मेमोग्राफी म फिनोलेक्स इंडस्ट्रीज लि.तर्फे करण्यात येणार आहे.